# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ २९५ /२०२१-२२ दिनांक :- २२/११/२०२१

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर नोटीस प्रत.**

(कांचन गायकवाड)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र.मनपा/वृ.प्रा / 295/2021-22

दिनांक :- 22/11/2021

## // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1. | सदरचे झाड भाईंदर (प.) उत्तन नवघर, डॉन बास्को, मोह तलाव उद्यान येथिल जागेतील घराजवळ उंच वाढलेले असून सदर झाड घरावर वाकलेले आहे. तसेच झाडाची मुळे जमीनीवर आलेली आहेत. या कारणास्तव सदर झाड मुळासहीत काढणे आवश्यक आहे.**(श्री.रॉबर्ट पिटर डिसोजा यांचे दि.15/09/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग चिंच |
| 2. | सदर 1 नग बॉटलपामचे झाड अंदाजे 20 ते 25 फुट उंच, 02 नग समुद्रफुल झाड अंदाजे 10 ते 12 फुट उंच, 01 नग कडुलिंब अंदाजे 10 ते 12 फुट उंच असून सदर झाडे मौजे भाईंदर, श्री वल्लभ इमारतीच्या गेटसमोर मनपा रोडवरती असल्याने वाहनांना ये-जा करण्याकरिता व ऑफिसच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर रहदारीसाठी अडथळा निर्माण करत आहेत तसेच सदर झाडाची उंची पाहता सदरची झाडे काढुन त्याच जागेत इतर ठिकाणी पुर्नरोपन करणे शक्य आहे. या कारणास्तव सदरचे झाड काढुन त्याच जागेत इतर ठिकाणी पुर्नरोपन करणे आवश्यक आहे. **(मे.सालासर प्रॉपर्टी डेव्हलोपर्स यांचे दि.06/10/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग बॉटलपाम 01 नग कडुलिंब 02 नग समुद्रफुल |
| 3. | सदरचे झाड भाईंदर (प.) डोंगरी तळावली उत्तन येथिल' ग्रीन विला', श्री.जेम्सी नुनिस यांच्या घरावर वाकलेले असून सदर झाड पुर्णपणे सुकलेले आहे. या कारणास्तव सदर सुकलेले झाड मुळासहीत काढणे आवश्यक आहे. **(श्री.रेनॉल्ड जॉन मेन्डोसा यांचे दि.27/10/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग आंबा |
| 4. | सदरचे झाड भाईंदर (प.) पाडूरंग निवास, राईगाव मार्केटजवळ, उत्तन रोड येथिल कंपाऊंडजवळ वाढलेले असून सदर झाड कंपाऊंडच्या बाजुला असलेल्या श्री.राजेंद्र पाटील यांच्या घराच्या पत्र्यावर वाकलेले असुन घराचे पत्रे फुटत आहे. तसेच झाडाची मुळे जमीनीवर आलेली आहेत. या कारणास्तव सदर झाड मुळासहीत काढणे आवश्यक आहे.**(श्रीम.मिना प्रेमनाथ राऊत यांचे दि.12/10/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग नारळ |
| 5. | सदरचे झाड भाईंदर (प.) घर क्र.376/2, राई येथिल कंपाऊंडजवळ वाढलेले असून सदर झाड कंपाऊंडच्या बाजुला असलेल्या चाळीच्या पत्र्यावर वाकलेले असुन घराचे पत्रे फुटत आहे. तसेच भिंतीला तडे गेलेले असुन झाडाची मुळे जमिनीवर आलेली आहेत. या कारणास्तव सदर झाड मुळासहीत काढणे आवश्यक आहे.**(श्री.आत्माराम सखाराम भुरवणे यांचे दि.03/02/2021 रोजीचे पत्र.)** | 01 नग नारळ |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त् (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)

सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी